निगमित संप्रेषण एवं निवेशक संबंध
प्रधान कार्यालय: लोकमंगल, शिवाजीनगर, पुणे-5
दूरभाष : 020-25614495, 25614366, 25514501 से 12 विस्तार

# वृत्तपत्रीय निवेदन

## बँक ऑफ महाराष्ट्रचे "महाबँक नक्षत्र" हे स्वतःचे खाजगी क्लाउड मंचाची सुरवात

**पुणे, १७ मार्च, २०२३:** बँक ऑफ महाराष्ट्र (बीओएम) या देशातील सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य बँकेने "महाबँक नक्षत्र" हे स्वत:चे खासगी क्लाउड प्लाटफॉर्म सुरु करून खासगी क्लाउड पायाभूत सुविधांचा अवलंब केला आहे. यामुळे बँकेच्या डिजिटल पायाभूत सुविधा आणि होस्टिंग अनुप्रयोगांसाठी आवश्यक असलेली उच्च – कार्यक्षमता क्लाउड तंत्रज्ञान सहज सुलभ होईल.

या प्रसंगी बँक ऑफ महाराष्ट्राचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए.एस. राजीव म्हणाले, "क्लाउड टेक्नॉलॉजीचा अवलंब करणे ही काळाची गरज आहे आणि सुविधा लवचिकता आणि अनुभव मिळविण्यासाठी आणि आपल्या डिजिटल सेवांना मजबूतीने गती देण्यासाठी या मंचाचा स्वीकार करण्यास बँकेची तयारी आहे. पायाभूत सुविधामधील वाढीमुळे आमच्या ग्राहकांना सेवा वितरण सोयीसह बँकेच्या डिजिटल परिवर्तनाच्या प्रयत्नांना चालना मिळून डिजिटलायझेशन आणि अन्य अनेक क्षेत्रांमध्ये व्यवसायामध्ये नवे मार्ग खुले होतील "असे मत श्री राजीव यांनी मत व्यक्त केले.

बँक ऑफ महाराष्ट्राचे कार्यकारी संचालक श्री आशिष पांडे म्हणाले की, "बँकेचा स्वतःचा असा खासगी क्लाऊड मंच हा नाविन्यपूर्ण परंतु शाश्वत उपाय व मार्गांनी उच्च दर्जाची ग्राहक केंद्रीत व्यवसाय असण्यासाठी डिजिटल पायाभूत सुविधा असण्याच्या आमच्या बांधिलकीशी सुसंगत आहे. यामुळे पुढील काळातील अधिक प्रगत तंत्रज्ञान सामावून घेण्याच्या सोबतच भविष्यातील कामगिरी आणि विश्वासार्हतेस उत्तेजन मिळेल. श्री पांडे म्हणाले, "क्लाउड तंत्रज्ञानाद्वारे आम्ही आमची परीचालानात्मक कार्यक्षमता वाढविण्याचा व डिजिटल वितरण यंत्रणा अधिक मजबूत करण्याचे आमचे प्राथमिक उद्दीष्ट आहे."

नक्षत्र हे बँक ऑफ महाराष्ट्रचे स्वतःचे खाजगी क्लाऊड आणि आभासीकरण तंत्रज्ञान हे विद्यमान अनुप्रयोगांपेक्षा दुप्पट संख्येने अनुप्रयोग सामावून घेण्यसाठी तयार केले गेले आहे. यामुळे बँकेच्या डिजिटल अनुप्रयोगांच्या होस्टिंगसाठी अधिक लवचिकता, स्केलेबिलिटी, वर्धित सुरक्षा आणि आधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. एन एस एक्स- टीसह सर्व फ्लॅश व्ही एस ए एन साठवणीसह नक्षत्र दुप्पट संगणन आणि तिप्पट साठवणीसाठी उपयुक्त आहे आणि बँकेच्या पुढील 3 वर्षांसाठीची डिजिटल वाटचाल त्याआधारे होऊ शकणार आहे.

नक्षत्रात स्वयंचलन, आभासीकरण, विविध नियंत्रण स्तर उपलब्ध असून, बँक देखील आज्ञावली –सॉफ्टवेअर डीफाइंड नेटवर्किंग (एसडीएन), आज्ञावली – सॉफ्टवेअर डीफाइंड स्टोरेज (एसडीएस) आणि नेटवर्क फंक्शन वर्चुअलाइजेशन (एनएफव्ही) उपयोजित करून पुढे नेण्यासाठी बँक सज्ज आहे.
पुढच्या काळातील डिजिटल सेव्ही बँक म्हणून प्रस्थापित करण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र सातत्याने तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा वाढवित आहे आणि क्लाऊड तंत्रज्ञानाच्या स्वीकारामुळे नवीन तंत्राद्नानाचा स्वीकार करून त्याची सत्वर अंमलबजावणी करण्यासाठी बँक सक्षम होईल.